वाचले –

१) सचिव,मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठाण,आणे ता.जुन्नर,जि.पुणे यांचा दि २०/८/२०१० व दि २/८/२०११ चा अर्ज
२) सहाय्यक संचालक, नगर रचनाकार अहमदनगर यांचेकडील जा.क्र.बोशेप/मो.कर्जुले हर्या ता.पारनेर/ग.नं.२२१ व २२२/ससअह/३८९३ दिनांक २९/११/२०१०
३) कार्यकारी अभियंता,राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रं.१,नाशिक क्रं.रा.म.क्रं.९/रेशा/१८/२०११ दिनांक ३/२/२०११
४) जिल्हाआरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर क्रं.पीएच/डेस्क-४/एनओसी/८०७/१० दिनांक १४/९/२०१० चा ना हरकत दाखला.
५) कार्यकारी अभियंता(शतग्रा)मराविवितकंमर्या,अ.नगर जा.क्र.काअ/अन/शतग्रा/तां ८८/८८१५ दि.१/१२/२०१०
६) मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.भुस/कार्या/२६-क/एनएएसआर/२५४/१० दि. १५/१२/२०१० चा ना हरकत दाखला.
७) दुरसंचार विभाग, यांचेकडील क्रं.डब्लू-२/एनओसी/एसडीई(आर)/टीकेआर/९५ दिनांक ३०/१०/२०१०
८) तहसिलदार नगर यांचेकडील क्र.कावि-बिशे/४९४/२०१० दिनांक २५/११/२०१० चा अहवाल
९) महाराष्ट्र जमिन अधिनियम १९६६ चे कलम ४४
१०) सचिव,मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठाण,आणे ता.जुन्नर,जि.पुणे यांनी वार्षिक अकृषिक सारा, स्थानिक उपकर ८ पट बाबतचे दि ११/८/११ चे चलन व मोजणी फी पावती दि १२/८/११
११) मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील क्र.मह./कार्या/३ब/७८२/२००५, दि.३१/१०/२००५ चे आदेश

---

उपविभागीय अधिकारी,
नगरभाग,अहमदनगर यांचे कार्यालय
क्र.कार्या/२ज/एनएएसआर/९१/२०११
अहमदनगर, दि. २०/८/२०११

## आदेश –

मौजे कर्जुले हर्या ता.पारनेर,जि.अहमदनगर येथील ग्राम पंचायत हद्दीतील ग.नं.२२१,२२२ पै मधील क्षेत्र ४०००० चौ.मी. मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठाण,आणे यांचे मालकीचे आहे. वर नमूद मिळकती मधील ग.नं. २२१,२२२ पैकी ४०००० चौ.मी. क्षेत्रास शैक्षणिक कारणांसाठी अकृषिक परवानगी मिळणेकामी दि २०/८/२०१० व दि २/८/२०११ अर्ज केलेला होता.

अर्जदार यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वर नमूद सर्व विविध खात्यांकडून ना हरकत दाखले मागविणेत आलेले होते तसेच तहसिलदार पारनेर यांचेकडून देखील चोकशी अहवाल मागविणेत आला होता

अर्जदार यांनी आवश्यक ते सर्व खात्यांचे ना हरकत दाखले हजर केलेले आहेत. तसेच तहसिलदार पारनेर यांनी सदरच्या अर्जाची चोकशी करुन, अर्जदार यांना त्यांचे वर नमूद शैक्षणिक या कारणांसाठी अकृषिक वापरास परवानगी देणेस हरकत नाही असे अभिप्राय दिलेले आहेत. तसेच अर्जदार यांना अकृषिक करावयाचे एकुण क्षेत्र ४०००० चौ.मी. त्याचा अकृषिक सारा रु ०.१० पै.प्रमाणे वार्षिक अकृषिक सारा रु ४०००/- अधिक स्थानिक उपकर ८ पट रक्कम रु ३२०००/- अशी एकूण रक्कम रु. ३६०००/- व मोजणी फी भरणे बाबत इकडील दि.१०/८/२०११ च्या पत्रान्वये कळविले असता, अर्जदार यांनी सदरची रक्कम रु ३६०००/- दि ११/८/२०११ रोजी चलनांने सरकार जमा करुन चलनांची प्रत व मोजणी फी रु ४५००/- भरले बाबतची दिनांक १२/८/२०११ ची पावती हजर केलेली आहे.

त्याअर्थी मी, उप विभागीय अधिकारी, नगरभाग, अहमदनगर मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठाण,आणे यांचे मौजे कर्जुले हर्या ता.पारनेर ग.नं.२२१,२२२ मधील क्षेत्र ४०००० चौ.मी. क्षेत्रास शैक्षणिक कारणासाठी अकृषिक परवानगी देणेत येत आहे.

### अटी

१) प्रश्नाधिन जमिनीचा ज्या तारखेपासून बिनशेती वापर सुरु केलेला आहे. त्या तारखेपासून रस्त्याचे क्षेत्र २२०२.०० चौ.मी. वजा जाता उर्वरीत ३७७९८.०० चौ.मी. क्षेत्रावरील प्रतिवर्षी भुधारक/भूखंडधारक यांनी प्रती चौ.मी.ला रु ००.१० पै. दराने बिनशेती सारा भरावा.सदरचा बिनशेती सारा रु.३७८०/- अधिक स्थानिक उपकर एवढा येत आहे.

-२-

Principal
Matoshri Ayurved College,
Hospital and Research Center
Karjule Harya(Ahmednagar)

२)अर्जदार यांनी सदर जमीनीचा वापर फक्त शैक्षणिक या कारणासाठीच करावा. सदरचे क्षेत्रात बांधकाम करावयाचे झाल्यास, बांधकामासाठी परवानगी घेणे आवश्यक राहील,तसेच सदर वापरात बदल करावयाचा ठरल्यास तत्पूर्वी मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

३) मा. जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय प्रश्नाधिन क्षेत्रातील भूखंडाची उपविभागणी/ सुधारीत रेखांकन/ एकत्रिकरण करता येणार नाही.

४) रेखांकनात मा. जिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय बदल करु नयेत.

५) कोणतेही शैक्षणिक,बांधकाम कल्याण अहमदनगर पाथर्डी नांदेड राष्ट्रीय महामार्ग क्रं.२२२ लगत कि.मी.१७१/७०० रस्त्याच्या मध्यापासून ७५.०० मीटर अंतरावर असलेल्या नियंत्रण रेषेच्या आत करता येणार नाही

६)अर्जदारास सदर भूखंडाची विक्री करावयाची असेल तर आदेशातील अटीचा तसेच सनदेतील अटींचा उल्लेख करावा.

७) एक महिन्यात सनद करुन घ्यावी.

८) अर्जदार यांनी दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास सदरचा आदेश रदद समजणेत येईल व त्याची पूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

९) सदरचा आदेश हा वेळोवेळी अंमलात येणा-या कायदयामधील तरतुदींना अधिन राहुन देण्यात आलेला आहे.

१०) मिळकत धारकाने या आदेशापासून एक महिन्याच्या आंत आदेशातील नमुद केलेल्या अटी व शर्तीवर अनाधिकृत अकृषिक वापर नियमित केल्याबाबत महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनींचे वापरात बदल आणि बिनशेती आकारणी ) नियम १९६९ मधील फॉर्म ६ मध्ये कबुलायत ( सनद ) करुन घ्यावी.

११) सहा.संचालक, नगर रचनाकार अ.नगर यांचेकडील दि.२९/११/२०१० प्रत सपवेत जोडली असुन ना हरकत दाखल्यांत नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधन कारक राहील.

१२)कार्यकारी अभियंता(शतप्रा)मराविवितकं.मर्या.अ.नगर यांनी त्यांचेकडील नाहरकत दाखल्यात नमूद केले प्रमाणे नियोजित आराखडयातील मोकळया जागेत रस्त्यालगत वीज कंपनीच्या रोहित्रासाठी ३×३ मीटर आकाराची जागा राखीव ठेवण्यात यावी.

१३) सार्वजनिक बांधकाम खात्याच्या परवानगीशिवाय रस्त्याच्या बाजुला कोणत्याही प्रकारचे जाहीरात फलक लावता येणार नाही.

१४) सदर जागेवर नियमित करुन देण्यांत आलेल्या बांधकामाव्यतिरिक्त अतिरिक्त बांधकाम करावयाचे झाल्यांस त्यास सक्षम प्राधिका-याकडून बांधकाम नकाशे मंजूर करुन घेऊन या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१५) या आदेशातील कोणत्याही शर्त अगर अटीचा भंग झाल्यास सदरचे बेकायदेशीर बांधकाम काढून टाकण्यांत येईल.

१६) सध्या सदर क्षेत्रात चालू असलेल्या लाईनचे दोन्ही बाजुस नियमा प्रमाणे प्रत्येकी सुरक्षित १५ फुट अंतर सोडणे बंधनकारक राहील.

१७) प्रत्यक्ष बांधकाम सुरु करणेपूर्वी बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१८) नियंत्रण रेषेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा ना हरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

१९) प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्र समुचित प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधन कारक राहील.

२०) भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने तसेच पाण्याचे स्त्रोत कमी झाल्याने व उपलब्ध होणारे पाणी अनावश्यकरित्या वाया जात असल्याने उदभवणारी पाणी टंचाई विचारात घेता पावसाचे वाया जाणारे पाणी भूगर्भात जिरविणे व साठविणे आवश्यक आहे. तरी बांधकाम सुरु करतांना त्या छतावरील पाणी नजिकच्या बोअर/ विहीरीत सोडणे अथवा टाकीत साठविणे बंधनकारक आहे. जेणेकरुन पावसाळयात छतावर पडणारे पाणी वाया न जाता त्याचा वापर भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे तसेच त्या पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी होवू शकतो याकरीता सदर बांधकाम करतांना रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग करणे बंधनकारक आहे. सदर अटीची पूर्तता न केल्यास बिनशेती आदेश रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

-३-

Principal
Matoshri Ayurved College,
Hospital and Research Center
Kanjule Harya(Ahmednagar)

२१) जागेच्या चतु:सिमा व हद्दीबाबत वाद उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार जबाबदार राहतील

## - शास्तीविषयक खंड -

अ)उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाधा न आणता जिल्हाधिकारी निर्देशीत करतील अशी आकारणीची रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम ३२९ पोट कलप (२) ला अधिन राहून निर्देशित करतील असा दंड भरल्यानंतर भूखंड अर्जदार यांचे ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

ब) उपखंड अ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द कोणत्याही ईमारत किंवा बांधकाम उभारण्याचे झाल्यास किंवा वापरण्यात आलयास जिल्हाधिकारी यांनी विनिर्दीष्ट केलेल्या मुदतीत बाधित ईमारत/ बांधकाम अशा प्रकारे ( इंमारत / बांधकाम ) काढून टाकणेत आले किंवा त्यात बदल करणेची व्यवस्था करणेत येईल आणि त्याबाबतचा खर्च संबंधितांकडून जमीन महसुलाची थकबाकी असलेप्रमाणे वसूल करणेत येईल.

क) सदरची परवानगी कुळकायदा ग्रामपंचायत कायदा व इतर निगडीत असलेल्या सर्व कायदयाच्या तरतुदीस अधिन राहणेचे अटीवर देण्यांत येत आहे.

सही/---
( महेश पाटील )
उपविभागीय अधिकारी
नगर भाग, अहमदनगर.

प्रत-
सचिव,मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठाण,आणे ता.जुन्नर,जि.पुणे

प्रत- मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर ( महसूल शाखा/ अंतर्गत लेखा शाखा ) यांच्याकडेस सविनय सादर.

प्रत- मा. तहसिलदार पारनेर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/-प्रस्तुत प्रकरणी ता. नं. २ या र. नं. २ बिनशेती नोटबुकमध्ये योग्य त्या नोंदी घ्याव्यात. अर्जदार यांचेकडून विहीत नमुन्यात सनद तयार करुन घ्यावी व सनदेत उपरोक्त अटी समाविष्ट कराव्यात. सनद करुन घेतल्याशिवाय भूखंडवाईज नोंदी व भूखंड नोंदी व भूखंड भूखंड विक्रीच्या नोंदी गावदप्तरी करु नयेत. तसेच पोटहिस्साप्रमाणे बिनशेती क्षेत्राचा नवीन ७/१२ उतारा करुन घ्यावा.

प्रत - उपअधिक्षक भुमी अभिलेख पारनेर कडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत-- तलाठी कर्जुले हर्या ता. पारनेर यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना

उपविभागीय अधिकारी
नगर भाग, अहमदनगर.

उप विभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर

Principal
Matoshri Ayurved College,
Hospital and Research Center
Karjule Harya(Ahmednagar)